INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 8 | SEPTEMBER – 2025

# बंजारा बोली भाषा- गोरमाटी

**प्रा. यशदीप शंकराव राठोड**
संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग
संत ज्ञानोपासक महाविद्यालय संशोधन केंद्र, परभणी ता.जि.परभणी.

**डॉ. भालेराव जी. पी.**
संशोधक मार्गदर्शक
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली.



वन+ज+अरि अशा एकत्रीत शब्दापासून बंजारी शब्द बनतो. बंजारा हे उत्तरेकडे 'ब्रिजांरी' या नावानेही मोडतात. वनातच जन्म घालून व्यापार करू लागल्याने उपरोक्त नाव पडले. बंजारा या शब्दाला मराठी शब्द बंन्जाड तर ऊर्दुमध्ये त्याचा अर्थ पडीत जमीन असा होता. पडीत जमीनीवर रोजीरोटी मिळविणारे असा अर्थ यातून प्रस्तुत होता. प्राचीन कालखंडात दळणवळणाची साधने उपलब्ध नसल्यामुळे बैलाच्या पाठीवरून एका प्रदेशातून दुस-या प्रदेशात सामान पोहोचविण्याचे काम करीत असत. व्यवसायाचा आधार बैल असल्यामुळे पशुधन मोठया प्रमाणात त्याकाळात बाळगले जात असे.

## उदिदष्टेः

1) बंजारा शब्दाची उत्पत्ती कशा पध्दतीने झाली याचा मागोवा घेणे.
2) लिखीत व बोली भाषेतील फरक अभ्यासणे.
3) बोली भाषा व लिपी विषयी माहिती जाणून घेणे.

## गृहितकेः

1) बंजारा समाजाचे लोकजीवन परिपूर्ण आहे.
2) भटकंती जीवन जगणारे अधिकाधिक बोली भाषेचा वापर करतात.
3) बोली भाषेत अनेक नवनवीन शब्द सामील होतात.

**भारतीय समाज हा समुहाने जगणारा समाज आहे. तो व्दैत मानणा-या व्यक्ती वादाला प्राधान्य देणा-या पश्चिमात्य समाजापेक्षा वेगळा आहे. तीन हजार मातृभाषा, चार हजार जाती जमाती, चार हजार धार्मीक परंपरा, विश्वास या सगळयातुन जे काही मिश्रण तयार होते ते कुठेही आढळणार नाही इतकी विविधता असूनही ते सगळे एकमेकांशी ज्या त-हेने बांधले गेले आहेत ते अविश्वसनीय आहे.**

**बंजारा समाजातील लोक गोरमाटी भाषा बोलतात. भाषा परिवर्तनशील असल्याने तिचे स्वरूप एक सारखे राहू शकत नाही. इतर भाषांच्या संपर्कामुळे व प्रभावामुळे नवनवीन शब्दाची त्यात भर पडली आहे. भारताच्या बोली भाषा दोन भागात विभागल्या आहेत. एक उत्तर भारतीय भाषा तर दुसरी दक्षिण भारतीय भषा, गोरमाटी उत्तरभारतीय भाषा लिपी नसणा-या भाषांमध्ये तीचा उल्लेख करण्यात येतो. गुजराती, मेवाडी, हिंदी निंबाडी, भोजपूर राजस्थानी भाषेचा प्रभाव पडलेला आहे. गोरमाटी भाषेतील शब्द फारसी ग्रीक, लॅटीन भाषेत ऐकावयास मिळातात. बंजारा समाज भटक्या अवस्थेत होता. मिठ व गव्हाचा व्यापार करणारी जमात म्हणून ओळखली जात असे. बंजाराला अनेक शब्दाने संबोधले जात असे जसे की, लमानी, लमान गोर बंजारा, लमाण लभाना, लंभाडा, चारण बंजारा, मयुरिया, गोर लदेणिया, गुजरिया इत्यादी**

**प्रत्येक भाषा ही सुध्दा एक बोलीच आहे. बोलीभाषा, लोकभाषा भाषा ही एक सामाजीक संस्था आहे. भाषे बाहेर संस्कृती असू शकत नाही. मनुष्याच्या बुध्दीव्यवहारातील प्रत्येक क्षमतेसाठी वेगवेगळया संदर्भात भाषा ही सीमारेषात्मक प्रतिशब्द वापरण्यात आलेला आहे. अखंडीतपणे भारतीय संस्कृती प्रवाह वाहता ठेवण्याचे महान कार्य बोली भाषेने केले आहे.**

### गोरमाटीः

**भाषाशास्त्रानुसार भारतात** 325 **भाषा बोलल्या जातात. भाषाची विभागणी चार भागात केली आहे जसे की**, i) Austria (Austrasia) ii) Dravidian iii) Indo-European iv) Sino-Tibetan **(पान न.**31 **संरा.श्री मोरवंचीकर शिल्पकार चरित्र कोश खंड** 1 **इतिहास साप्ताहीक विक मुंबई-**2009) **बंजारा लोक आपल्या सांस्कृतीक एकिकरणास गोरवट असे म्हणतात. बंजारा स्वतःची ओळख म गोर (मी गोर) अशी करून देतो. स्वतःला हे लोक गोर म्हणून घेतात. गोरमाटी म्हणजे बंजारा स्त्री पुरूष असा बंजारा बोलीतील शब्द आहे. स्वतःच्या बोलीला देखील हे लोक गोरबोली गोरू र बोली म्हणून संबोधतात. बंजारा गणाचे नाव गोर बंजारा गण हे असावे. गोरमाटी भाषा एका पिढीपासून दुस-या पीढीकडे वारसा पध्दतीने चालत आलेली आहे. राजस्थानी भाषेची उपभाषा म्हणून तिला ओळखले जाते.(पान नं.**588 **संपादक अरून जाखडे भारतीय भाषंचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र पदमगंधा प्रकाशन पुणे**, 2023)

**गोरमाटीचा इतिहास गीते, भजन, दंतकथा, लोककथा, सण, उत्सव प्रथा, परंपरा इत्यादीच्या स्वरूपात जीवंत आहे. गोरमाटी भाषेत लहान-थोरांसाठी समान शब्दाचा प्रयोग केला जातो. अर्थात एकेरी शब्द गोरमाटी भाषेत प्रचलित आहे.**

**प्रा. मोतीराम राठोड (गोरबंजारा संशोधक) यांच्या मते, मध्य व उत्तर भारतापासून ते पाकीस्तान, अफगाणिस्थानच्या आदिवासी भागापर्यंत गोरमाटी भाषेचे अस्तित्व दडलेले आहे. (पान नं.**586 **भारतीय भाषांचे सर्वेक्षण महाराष्ट्र) 'चार कोस पाणी बदले, दस कोस पर वानी' या म्हणीप्रमाणे उपरोक्त भाषेत बोलण्याची उच्चारण पध्दतीत अंतर दिसून येते. मूळ शब्दाच्या आर्थाला कोणत्याच प्रकारची बाधा पोहोचत नाही. नेमाडी आणि गोर बोलीत साम्य पहावयास मिळते म्हणून तिला बहिणी बोली असून राजस्थानी भाषा तीची आई आहे असा विचार प्रवाह दिसतो.**

## निष्कर्षः

1) **गोरमाटी भाषा सर्व समाज बांधव बोलतात**

2) **बोली भाषा प्रवाही असल्यामुळे अनेक शब्द त्यात समाविष्ट होतात.**

## संदर्भ ग्रंथः

1. **प्रा. गणपत राठोड- बंजारा लोकगीतों का सांस्कृतीक अध्ययन**
2. **डॉ. रूख्मीन पवार - बंजारा लोकजीवन पध्दती कैलास पब्लीकेशन औ.बाद.**
3. **डॉ. यशवंत जाधव - बंजारा जाती आणि समाज संस्कृती - वाणी प्रकाशन, दिल्ली**
4. **बळीराम पाटील- गोर बंजारे लोकांचा इतिहास, बळीराम पाटील स्मारक समिती, प्रकाशन, यवतमाळ**